दैनिक
जनप्रभात
Page 5
01 Aug 2024

# मार्जिन मनी योजनेचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

नागपूर ■ दिलीप येवले
9890561241

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील घटकांकरीता मार्जिन मनी योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयान्वये शासन स्तरावरुन निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे १६ मार्च २०२१ चे शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचनांचा समावेश करण्यात आला आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी मार्जिन मनी योजनेचे प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे आवाहन केले आहे.इच्छुक लाभार्थ्यांनी मार्जिन मनीचे प्रस्ताव सर्व अटी व शर्तीची पुर्तता करून सहायक आयुक्त, समाज कल्याण, वी-विंग, सामाजिक न्याय भवन, शासकीय आय.टी. आय. समोर, श्रद्धानंदपेठ, नागपूर येथे सादर करावे.